REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी:
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १५ मे, १९४० अंक २०

लेखक—अत्रे.

अर्धांगी

दिग्दर्शक—विनायक

( वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे
( खास व्यवस्थेखालील ) पुणें मिनर्व्हांत ३ रा आठवडा
पुणें-फोन ३९८

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.
भूमिका:—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्कायर,
एम. ए., कैंटब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. ऽ एजन्सीकरितां आजच लिहा. ऽ हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

## विविध माहिती

### साखरेचें जागतिक उत्पादन

चालू हंगामांत सर्व जगांतलें साखरेचें एकूण उत्पादन तीन कोटि टन होईल असा अंदाज आहे. सध्याच्या धामधुमीच्या काळांत असला अंदाज करणें कठिण आहे. तसेंच, हें उत्पादन जागतिक मागणीच्या मानानें कितीसें मोठें आहे हेंहि सांगतां येणार नाहीं. कित्येक देशांत लोकांनीं करावयाच्या साखरेच्या उपयोगास मर्यादा घालण्यांत आल्या आहेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी विस्कटून गेली आहे.

### तटस्थपणाचा खर्च

युरोपांतील तटस्थ राष्ट्रांसहि स्वसंरक्षणाच्या तयारीप्रीत्यर्थ लष्करी खर्च मोठ्या प्रमाणावर करावा लागत आहे. बेल्जमची लोकसंख्या फक्त ८४ लक्ष आहे; पण जरूर पडल्यास युद्धास उपयोगी पडतील असे ६ लक्ष सैनिक तेथें तयार आहेत. लष्करी तयारीचा बेल्जमचा गेल्या वर्षाचा एकूण खर्च ६६ कोटि रुपये इतका होईल असा अंदाज आहे.

### मुंबईंत १५० टन क्लोरीन लोक पाण्याबरोबर पितात

पिण्याचें पाणी शुद्ध करण्यासाठी मुंबईमध्यें दरवर्षी १५० टन क्लोरीन वापरण्यांत येतें आणि तें शहरच्या रहिवाशांस पाण्याबरोबर प्यावें लागतें. युद्धामुळें क्लोरीन दुर्मिळ झालें असून त्याच्या बदली दुसरें कार्यक्षम द्रव्य वापरण्याचा मुंबईच्या कॉर्पोरेशनचा विचार आहे.

### कॉडलिव्हरच्या ऐवजी भुइमूग तेल

कॉडलिव्हर तेलाचा युद्धाच्या धामधुमींत तुटवडा पडणार असल्यानें त्याच्या ऐवजी भुइमुगाचें तेल वापरण्याची शिफारस ब्रिटिश मेडिकल कौन्सिलनें केली आहे.

### तागाचे बाजारभाव स्थिर राखण्याची योजना

हिंदी तागाचे बाजारभाव वरखालीं हेलकावे खातात, ह्यामुळें ताग पिकविणारे शेतकरी, व्यापारी व त्याचें कापड बनवणारे कारखानदार ह्यांच्या धंद्यांत गोंधळ उडतो व त्यापासून सर्वांचें नुकसान होतें. ह्यासाठी तागाचे बाजारभाव निश्चित करून त्यांत कमी अधिक झाल्यास, एक फंड ह्या धंद्यांत निर्माण करण्यांत येईल, त्यामधून वजावाट व भरपाई होण्याची एक योजना मध्यवर्ति ज्यूट असोसिएशननें तयार केली आहे. तिच्यावर लोकमत गोळा करण्यांत यावयाचें आहे.

### अमेरिकेकडे सोन्याचा ओघ वहातो

१९३९ सालांत अमेरिकेंत सोन्याची निव्वळ आयात ३५७ कोटि डॉलर्स किंमतीची (सुमारें १०७० कोटि रुपये) झाली. ह्यापैकीं २५८ कोटि डॉलर्सचें सोनें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांमधून अमेरिकेंत गेलें.

### बडोद्यांत रजिस्टर झालेले दस्तऐवज

बडोदा संस्थानच्या रजिस्ट्रेशन खात्यामार्फत जमिनीची विक्री, गहाण, मृत्युपत्रें इत्यादि व्यवहारांचे दस्तऐवज नोंदले गेले, त्यांत १९३८–३९ सालीं २ कोटी, ६४ लक्ष रुपयांची उलाढाल झाली. १९३७–३८ सालचा तत्सम आकडा २ कोटि, ५१ लक्ष होता.

### फिन्लंडमधील ऑलिंपिक सामने बंद

चालू सालीं आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक सामने फिन्लंडमध्यें व्हावयाचे होते, ते युद्धपरिस्थितीमुळें होऊं शकत नाहींत असें प्रसिद्ध झालें आहे.

### इटालियन बँकेंत सोन्याचा तुटवडा

इटलीच्या मध्यवर्ति बँकेचा सुवर्णसंचय सारखा घटत चाललेला आहे. १९३७ अखेर ह्या सुवर्णनिधि सुमारें ४०० कोटि लायर होता, तो गेल्या वर्षाच्या अखेरीस २७० कोटि लायरवर आला. ह्या मुदतींत कागदी चलन मात्र १७४६ कोटि लायरचें २४४० कोटि लायर झालें आहे.

### एंपायर ऑफ इंडिया विमा कंपनी

एंपायर ऑफ इंडिया लाइफ ॲशुअरन्स कंपनीनें गेल्या वर्षी १ कोटि, ५७½ लक्ष रुपयांच्या ९,२७४ पॉलिसी दिल्या. प्रत्येक विम्याची सरासरी रकम १,७०० रुपये होती.

### चेकसची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें ३ मे अखेर संपलेल्या आठवड्यांत २० कोटि, ८९ लक्ष रुपयांच्या १ लक्ष, ७½ हजार चेक्सची देवघेव झाली.

### विष्णू आणि लक्ष्मी कॉटन मिल्स

विष्णू कॉटन मिल्स लि. ला १९३९ मध्यें ४ लक्ष १९ हजार रुपये निवळ नफा झाला. लक्ष्मी कॉटन मॅन्युफॅक्चरिंग कंपनीनें १ लक्ष ९३½ हजार रुपये नफा दाखविला. 'विष्णू' नें प्रेफरन्स भागावर प्रत्येकीं ३५ रुपये आणि ऑर्डिनरी भागांवर कर माफ ६० रुपये डिव्हिडंड दिलें. 'लक्ष्मी'च्या प्रत्येक भागावर २० रुपये डिव्हिडंड पडलें.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे नवे डायरेक्टर

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे डायरेक्टर होण्याची सर अर्देशिर दलाल ह्यांस बोर्डानें केलेली विनंति त्यांनीं मान्य केली आहे.

### बी. ई. एस. टी. कंपनी

बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय ॲन्ड ट्रॅमवेज कं. लि. ला गेल्या वर्षी ३८½ लक्ष रुपये नफा झाला. प्रत्येक भागास ६ रुपये डिव्हिडंड मिळालें.

### जादा नफ्यावरील कराची आकारणी

जादा नफ्यावरील नफ्याच्या आकारणीस येत्या जुलैपासून आरंभ होईल, असें समजतें. तोंपर्यंत आवश्यक ते फॉर्म्स छापून तयार होतील. इनकमटॅक्स खात्याकडे ह्या नवीन कर आकारणीच्या कायद्याच्या अंमलबजावणीचें काम देण्यांत आलें आहे.

### इंटरनॅशनल लेबर कॉन्फरन्सचें अधिवेशन

आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या १९४० च्या अधिवेशनास जिनीव्हा येथें ५ जून रोजीं प्रारंभ होईल, असें जाहीर झालें आहे.

### मादक पदार्थांची चोरून वाहतूक

इजिप्तमधील कांहीं लोक जस्ताच्या डब्यांत अफू वगैरे मादक द्रव्यें घालून तीं उंटांच्या पशांत कोंबतात आणि इष्ट स्थळीं उंट पोंचल्यावर त्यांस ठार करून ते डबे काढून घेतात आणि उंटांचें मांस विकून टाकतात, असें उघडकीस आलें आहे.

### कॉमन्ससभेंतील मतनोंदणी

ब्रिटिश सरकारच्या युद्धविषयक धोरणावर कॉमन्स सभेंत दोन दिवसांच्या चर्चेनंतर मतमोजणी झाली, तीमध्यें सरकारपक्षीयांच्या ४० सभासदांनीं विरोधी पक्षाचे बाजूनें मतें नोंदलीं, आणि २८१ विरुद्ध २०० अशा मतांनीं सरकारचा विजय झाला. तथापि वादविवादाचा रंग आणि दोन्ही पक्षांच्या मतसंख्येंतील लहान अंतर हीं सरकारी धोरणास किती कमी पाठिंबा आहे, हें दर्शवितात. सरकारपक्षीय १३० सभासद गैरहजर होते, त्यांपैकीं ३० आजारी असल्यामुळें येऊं शकले नाहींत आणि कांहीं लष्करांत दाखल होऊन परदेशीं गेलेले आहेत.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २३० | ५ दुर्गंधी कोळशांपासून तेल | २३७ |
| २ हिंदी बँकांचा शाखा विस्तार ... | २३१ | ६ ई. कौन्सिलची शुगर कमिटी ... | २३७ |
| ३ ग्रेट ब्रिटनचे नवे मुख्य प्रधान ... | २३२ | ७ जर्मनीचा कोंडमारा | २३७ |
| ४ स्फुट विचार ... नॉर्वेमधून पीछेहाट–ब्रिटिश मंत्रिमंडळाचें समर्थन–युद्धाचा वणवा पसरला–आणीबाणीची वेळ–हिंदी कारखान्यांची प्रगति | २३३ | ८ सनलाइफची प्रगति | २३८ |
| | | ९ पुणें म्युनिसिपॅलिटीची तज्ञ समिति ... | २३८ |
| | | १० बेल्जम व हॉलंड ... | २३८ |
| | | ११ निवडक बाजारभाव | २३९ |


# अर्थ

बुधवार, ता. १५ मे, १९४०

## हिंदी बँकांचा शाखाविस्तार

२

### निरनिराळ्या प्रांतांतील परिस्थिति

वीस ते पन्नास हजार वस्ती असलेल्या हिंदुस्थानांतील ६८ शहरांत एकहि बँक किंवा बँक-शाखा नाहीं आणि येथें बँकिंगच्या विस्तारास वाव आहे असें ह्या विषयावरील मागील लेखांत आम्हीं दाखविलें आहे. पांच हजार ते वीस हजार वसतीच्या ८८८ गांवांतहि बँक नाहीं पण त्यांपैकी कांहीं ठिकाणींच बँक चालवतां येणें शक्य होईल. सहकारी बँकांस येथें बराच वाव आहे आणि त्यांनीं हा प्रश्न हातीं घेण्यासारखा आहे. मोठ्या बँकांस शाखा काढणें सोयीचें व सोपें असलें तरी किफायतशीर होण्यासारखें नाहीं. सहकारी सेंट्रल बँका व अर्बन बँका ह्यांनीं लहान शहरांचें क्षेत्र शक्य तितकें व्यापलें पाहिजे. हिंदी बँकांची प्रादेशिक वाटणी समाधानकारक आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कित्येक शहरांमध्यें अनेक बँका आहेत, तर कांहीं शहरें व्यापारी दृष्टीनें महत्त्वाचीं असूनहि त्यांमध्यें थोड्याच बँकिंगच्या संस्था आहेत. पांच ते वीस हजार वसतीच्या कांहीं शहरांत प्रत्येकी १० बँका आहेत, तर पन्नास हजार वसतीच्या कित्येक शहरांत एखाद-दुसरीच बँक आहे. ह्या रीतीनें बँकांच्या संख्येच्या बाबतींत निरनिराळ्या शहरांत बरीच विषमता दिसून येते.

भिन्नभिन्न प्रांतांतली परिस्थिति काय आहे, हें आतां पाहूं. दिल्ली, अजमीर, मेरवाडा व वायव्य प्रांत येथें त्यांच्या आकाराच्या मानानें शहरी लोकसंख्या मोठी आहे. हे लहान प्रांत बाजूस ठेवले तर शहरी वसतीचें सर्वांत मोठें प्रमाण असलेला प्रांत मुंबई हा होय. ह्या प्रांतांत २२ टक्के लोक शहरी आहेत आणि त्याच्या खालीं मद्रास=१३½, पंजाब=१३, संयुक्त प्रांत=११ व मध्यप्रांत आणि वऱ्हाड=११ अशी प्रतवारी लागते. बंगाल, बहार, ओरिसा व आसाम ह्यांमधील प्रमाण अनुक्रमें करून ७, ४, ४ व १½ असें आहे. शहरी लोकसंख्या जेथें अधिक तेथें बँका व त्यांच्या शाखा ह्यांची संख्या अधिक अशी कल्पना सहज कोणाचीहि होईल. परंतु ती वस्तुस्थितीस धरून नाहीं. बँकांच्या सर्वांत अधिक कचेऱ्या (८११) मद्रासमध्यें आहेत. त्याच्या खालोखाल बंगालमध्यें ४११ आहेत. पंजाबची संख्या २५५ व मुंबईची १९८ आहे. शहरांच्या संख्येचा विचार केल्यास असें दिसतें कीं, संयुक्त प्रांताचा नंबर पहिला लागतो व त्यांत ४४१ शहरें आहेत. मद्रासमध्यें ३४२ शहरें आहेत, मुंबईमध्यें २१४, पंजाबांत १९९ व बंगालमध्यें १३९ आहेत. तरीहि ज्यांत बँक्स आहेत अशा शहरांची सर्वांत मोठी संख्या (२९८) मद्रासमध्यें आहे आणि बंगालचा नंबर त्याच्या खालोखाल (१०६) लागतो. पंजाबमध्यें अशीं शहरें ९८ आहेत, संयुक्त प्रांतांत ८० आहेत आणि मुंबईचा नंबर सर्वांच्या खालीं (५९) आहे.

शहरी लोकसंख्येचें एकूण संख्येशीं प्रमाण, शहरांची संख्या आणि बँक असलेलीं शहरें ह्यांच्या परस्पर संबंधाचा मेळ अपेक्षे-प्रमाणें लागत नाहीं असें वरील आकड्यांवरून समजून येईल. मुंबई प्रांतांतलीच (सिंध धरून) स्थिति पहा. येथें २२ टक्क्यांच-वर लोक शहरी वसतीचे आहेत पण प्रांतांतल्या २१४ शहरांपैकीं केवळ ५९ ठिकाणीं बँका आहेत. पण १४५ शहरें पांच ते वीस हजार वसतीचीं आहेत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. शिवाय, अर्बन सहकारी बँकांची संख्या मुंबईमध्यें इतर प्रांतांच्या मानानें मोठी आहे ही विशेष महत्वाची गोष्ट ध्यानांत बाळगली पाहिजे. जॉइंट स्टॉक बँका येथें मोठ्या शहरांस मर्यादित झालेल्या आहेत. येथील ५९ शहरांत १९८ बँका व त्यांच्या शाखा आहेत. ह्यांतल्या ७० एकट्या मुंबई शहरांत आहेत. दर २४ हजार शहरी लोकसंख्येस एक बँकेची कचेरी असे सरासरीचें प्रमाण मुंबई प्रांत व सिंध मिळून बसतें. बिगर शेड्यूल्ड बँक्सच्या शाखा फार थोड्या आहेत. २७ शहरांत असल्या २८ बँकांच्या ४६ शाखा आहेत. ह्याच्या उलट, ३२ शेड्यूल्ड बँकांच्या १५२ शाखा ५१ शहरांत आहेत.

मद्रास प्रांतांत मुंबईच्या खालोखाल शहरी वसती मोठी म्हणजे १४३ टक्के आहे. त्यामध्यें ३४२ शहरें आहेत आणि ४४ शिवाय करून बाकी सर्व शहरांत बँक आहे. ह्या २९८ शहरांत बँकांच्या कचेऱ्यांची एकूण संख्या ८११ आहे. दर शहरास दोन बँका आणि दर ८ हजार वसतीस एक बँक असें हें सरासरीचें प्रमाण बसतें. इतर प्रांतांच्या मानानें मद्रासमध्यें शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या शाखांचें जाळें अधिक विस्तृत रीतीनें पसरलें आहे. येथें १७ शेड्यूल्ड बँका १४२ शहरांत व्यवहार करीत आहेत आणि त्यांच्या शाखांची एकूण संख्या २९३ आहे. बिन शेड्यूल्ड बँकांची संख्याहि मोठी म्हणजे २७९ आहे. त्यांचें काम २३९ शहरांत चाललें आहे आणि त्यांच्या ५१८ शाखा आहेत. ह्या ठिकाणीं त्यांस शेड्यूल्ड बँकांच्या चढाओढीपासून त्रास होत नाहीं. फक्त ८४ शहरांत ह्या दोन प्रकारांच्या बँका एकत्र असलेल्या आढळतात; १५५ शहरांत बिगर शेड्यूल्ड बँका स्पर्धेवांचून व्यवहार करीत आहेत. अर्धवट शहरी व अर्धवट खेडेगावी अशा ठिकाणांत बँकिंगच्या सोयी मद्रास प्रांतांत भरपूर आहेत, हें त्याचें वैशिष्ट्य आहे. ह्या बँका अर्थातच लहान प्रमाणावर चालतात आणि त्यांचें व्यवहारक्षेत्रहि मर्यादित असतें.

पंजाबमध्यें बँकांच्या शाखांचा विस्तार चांगला झालेला आहे. तेथें १४ शेड्यूल्ड बँकांनीं ७६ शहरांत १८९ शाखांमार्फत व्यवहार चालवलेला आहे. वीस शहरांत बिगर शेड्यूल्ड बँका

शेड्यूल्ड बँकांशीं स्पर्धा करीत आहेत आणि २९ शहरांत त्यांचें एकट्यांचें काम चाललें आहे. ह्या बँकांची संख्या १८ आहे आणि ४२ शहरांत त्यांच्या ६६ शाखा आहेत. प्रत्येक शहरांत २ बँका आणि दर १२ हजार वसतीस एक बँक असें सरासरीचें प्रमाण पंजाबांत बसतें. संयुक्त प्रांतांत ४४१ शहरें आहेत, पण त्यांपैकी ३९१ पांच हजार ते वीस हजार वसतीचीं आहेत. ह्या कारणानें ४४१ शहरांपैकी फक्त ८० मध्यें बँक आहे. दर ३५ हजार शहरी वसतीस एक बँक असें सरासरीचें प्रमाण येथें पडतें. बंगाल प्रांतांत मोठीं शहरें थोडीं आहेत. त्यांची संख्या १३९ असून त्यांपैकी १३३ मध्यें पन्नास हजारांपेक्षा कमी वस्ती आहे. १३९ शहरांपैकी केवळ ४६ मध्यें ३२ शेड्यूल्ड बँका आपल्या १७८ शाखांमध्यें व्यवहार करीत आहेत. ह्या शाखांपैकी ७२ एकट्या कलकत्ता शहरांत आहेत; बाकीच्या १०६ शाखा ४५ शहरांमध्यें वांटल्या गेल्या आहेत. बँकांचे संबंधांतली बंगाल प्रांतांतली माहिती अपुरी असून रिझर्व्ह बँकेस रोख शिलकेचे आकडे पुरवणाऱ्या बँकाच तेवढ्या येथें हिशेबांत घेतल्या आहेत हें येथें नमूद करणें आवश्यक आहे. ८७ शहरांत काम करणाऱ्या २३३ असल्या बँका आहेत. शेड्यूल्ड व इतर बँका मिळून ३६ लक्ष शहरी लोकांच्या उपयोगासाठीं ४११ शाखा बंगालमध्यें आहेत. म्हणजे दहा हजार लोकांस सरासरीनें एक बँक येते. कांहीं विशिष्ट शहरांत बँकांची रेलचेलच झाली असून इतर शहरांत बँकच नाहीं असाहि प्रकार येथें आढळतो. चितगांव, कोमिला, रंगपूर इत्यादि ५० हजारांहून कमी वसतीच्या शहरांत प्रत्येकीं दहा ते तीस बँका परस्परांशीं स्पर्धा करीत असलेल्या दिसतात. बंगालमध्यें १०६ शहरांत बँकांची सोय आहे आणि बँका व त्यांच्या शाखा यांची एकूण संख्या ४११ आहे.

## ग्रेटब्रिटनचे नवे मुख्य प्रधान

मि. चेंबर्लेन ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला असून मुख्य प्रधानाची जागा मि. विन्स्टन चर्चिल ह्यांस देण्यांत आली आहे. मि. चर्चिल ह्यांचें आजचें वय ६५ आहे. १९ व्या वर्षी ते वयूबामध्यें युद्ध—कामगिरीवर गेले आणि पुढें त्यांनीं हिंदी सरहद्दीवरील आणि सुदानमधील लढायांत प्रत्यक्ष भाग घेतला. बोअर युद्धांत ते बोअर लोकांकडून पकडले गेले, परंतु त्यांचे-हातून ते निसटले. लष्करी पेशा सोडून सन १९०० मध्यें ते पार्लमेंटांत दाखल झाले आणि पुढें कॉन्सरव्हेटिव्ह पक्ष सोडून ते लिबरल पक्षास मिळाले. त्यांनीं वेगवेगळ्या मंत्रिमंडळांत निर-निराळ्या जबाबदारीच्या जागांवर कामें केलीं. गेल्या महायुद्धाचे प्रारंभीं ते फर्स्ट लॉर्ड ऑफ दि ॲडमिरॅल्टी होते. १९१५ सालीं ते फ्रान्समध्यें प्रत्यक्ष रणांगणावर लढण्यास गेले. ते १९१७ सालीं परत येऊन पुनः प्रधानमंडळांत युद्धविषयक कामाच्या पदावर दाखल झाले.

१९२९ सालीं मि. बॉल्ड्विन ह्यांचेबरोबर त्यांनींहि राजीनामा दिला. १९२४ ते २९ ते फडनवीस होते. त्यांनीं लिहिलेले अनेक ग्रंथ त्यांच्या लिखाणाच्या शैलीबद्दल आणि त्यांतील भारदस्त विवेचनाबद्दल प्रसिद्ध आहेत. मि. चर्चिल ह्यांनीं आजवर ब्रिटिश प्रधानमंडळांत अनेक जबाबदारीच्या आणि महत्त्वाच्या जागीं कामें केलीं, परंतु मुख्य प्रधानकीची वस्त्रें त्यांस मिळण्याचा योग आला नव्हता, तो आतां आला आहे.

## मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने

ह्या प्रांतांतील इस्पितळांची व दवाखान्यांची एकूण संख्या ३१-१२-३८ रोजीं ४५० होती.

१९३६ व १९३८ सालांत मुंबई इलाख्यांतील सरकारी, सार्वजनिक, म्युनिसिपल आणि लोकलफंड व खाजगी मदत यांच्या पैशावर चाललेल्या इस्पितळांत व दवाखान्यांत औषधोपचार करण्यांत आलेल्या इन्-डोअर (दवाखान्यांतील) व औट-डोअर (दवाखान्याबाहेरील) रोग्यांची संख्या, त्यांची दररोजची सरासरी संख्या, मृत्यूचें प्रमाण, व त्यांत किती इसमांची सोय होऊं शकते ती संख्या वगैरे माहिती पुढील पत्रकावरून दिसून येते:—

| — | | १९३६ | १९३८ |
|---|---|---|---|
| इस्पितळांत औषधोपचार केलेल्या रोग्यांची संख्या. | | १,०५,९९७ | १,२३,७१७ |
| इस्पितळांत न ठेवतां औषधोपचार केलेल्या रोग्यांची संख्या. | | २७,८९,११२ | ३४,८०,५७४ |
| औषधोपचार करण्यांत आलेल्या रोग्यांची एकूण संख्या. | | २८,९५,१०९ | ३६,०४,२९१ |
| किती इसमांची सोय होणें शक्य आहे ती संख्या | पुरुष ... | ३,६५३ | ३,८०१ |
| | स्त्रिया ... | २,७२७ | २,७७२ |
| रोग्यांची रोजची सरासरी हजेरी | इन्-डोअर. | ४,८४४·४ | ५,२२१·८ |
| | औट-डोअर | २६,८५६·० | ३४,८९८·८ |
| स्त्रियांच्या इस्पितळांत औषधोपचार करण्यांत आलेल्या रोग्यांची एकूण संख्या. | | ८९,०३१ | १,०९,८५३ |
| * बरें झालेल्या रोग्यांची संख्या. | | ९२,८६७ | ७०,८८३ |
| * मेलेल्या रोग्यांची संख्या ... | | ८,०७५ | ९,६४१ |
| * औषधोपचार करण्यांत आलेल्या (रोग्यांच्या) एकूण संख्येशीं मृत्यूचें शेंकडा प्रमाण. | | ७·६ | ७·८ |

* हें प्रमाण फक्त इन्-डोअर [दवाखान्यांतील] रोग्यांपुरतेंच आहे.

### शस्त्रक्रिया

१९३६ व १९३८ सालीं सरकारी, स्थानिक व म्युनिसिपल फंडावर चाललेल्या आणि खाजगी मदतीवर चाललेल्या इस्पितळांत व दवाखान्यांत करण्यांत आलेल्या शस्त्रक्रियांची संख्या पुढील पत्रकावरून दिसून येते:—

| — | १९३६ | १९३८ |
|---|---|---|
| केलेल्या शस्त्रक्रियांची संख्या ... | १,२९,१२३ | १,५५,९८२ |
| शस्त्रक्रिया करण्यांत आलेल्या इसमांची संख्या. | १,२६,४०५ | १,५१,११२ |
| मृत्यूंची संख्या ... | १,०४३ | १,०२७ |
| शस्त्रक्रिया करण्यांत आलेल्या इसमांच्या संख्येशीं मृत्यूचें शेंकडा प्रमाण. | ०·८ | ०·७ |

## स्फुट विचार

### नॉर्वेमधून पीछेहाट

नॉर्वेमधून ब्रिटिश फौजा परत आणणें भाग पडलें ही गोष्ट इंग्लंडमधील लोकांच्या मनास लागून रहाणें स्वाभाविक आहे. ह्या फौजांस तोफा व विमानें ह्यांची साथ नसल्याकारणानें शत्रूच्या माऱ्यापुढें त्या उघड्या पडल्या आणि त्या काढून घेणें हाच त्यांच्या रक्षणाचा मार्ग मोकळा राहिला. नॉर्वेवर स्वारी करून तो देश पादाक्रांत करूं पाहणाऱ्या जर्मन सैन्यास अडवून त्याची उत्तरेकडची प्रगति थांबवणें हा ब्रिटिश सैन्य नॉर्वेमध्यें पाठवण्याचा ब्रिटिश सरकारचा उद्देश होता आणि हें काम विलंब न लागतां होणें अगत्याचें होतें. अशा स्थितींत नॉर्वेंत पाठवण्यांत आलेली ब्रिटिश फौज लहान असणें आणि ती तीन निरनिराळ्या ठिकाणीं उतरली जाणें अपरिहार्य होतें. जुजबी शस्त्रास्त्रें असलेल्या व पांगलेल्या ह्या ब्रिटिश तुकड्यांस जर्मनीच्या मोठ्या व सुसज्ज फौजांपुढें टिकाव धरतां आला नाहीं ह्यांत नवल नाहीं. आपल्या सैन्याची झालेली दैना ब्रिटिश जनतेस अर्थातच सहन झाली नाहीं आणि तिनें मि. चेंबरलेन आदिकरून मंत्र्यांस ह्या विषयीं जाब विचारला. युद्धाचीं सूत्रें हालवणारे मंत्रि आपल्या कामास लायक नाहींत आणि त्यांच्या अव्यवस्थेचीं फळें ब्रिटिश राष्ट्रास भोगावीं लागलीं आहेत असा ब्रिटिश लोकांत समज पसरला. पार्लमेंटमध्यें गेल्या आठवड्यांत नॉर्वेंतील ब्रिटिश सैन्याच्या पीछेहाटीची खुली चर्चा झाली. त्या प्रसंगीं मि. चेंबरलेन आदिकरून मंत्र्यांनीं आपली बाजू स्पष्टपणें पुढें मांडली. तटस्थ राष्ट्रें त्यांच्यावर जर्मनीची प्रत्यक्ष स्वारी होईतों स्वस्थ बसतात; त्यांची दोस्त राष्ट्रांस यत्किंचितहि मदत होत नाहीं; आणि जर्मनी कायदे व शिष्टाचार ह्यांस धाब्यावर बसवून त्यांच्या मुलखांत शिरल्यावर ब्रिटिश फौजांच्या सहाय्याची तीं अपेक्षा करतात. अशा स्थितींत ब्रिटिश सरकारास त्यांस जरूर तें सहाय ऐनवेळीं पोंचवणें अशक्य होतें. नॉर्वेवरील जर्मन स्वारीची गोष्ट अशीच असल्यानें ब्रिटिश सैन्यें जर्मनीस बळी न देतां तीं परत आणण्यांत ब्रिटिश मंत्रिमंडळानें योग्य तेंच धोरण स्वीकारलें ह्या आशयाचें समर्थन मि. चेंबरलेन ह्यांनीं केलें. नॉर्वेंतील पिछेहाटीचा प्रतिकूल असा परिणाम युद्धाच्या मुख्य हालचालींवर होणार नाहीं असें आश्वासन त्यांनीं दिलें.

### ब्रिटिश मंत्रिमंडळाचें समर्थन

नाइलाज झाल्यावर ब्रिटिश फौज नॉर्वेमधून परत आणणें अपरिहार्य होतें ही गोष्ट मान्य केली तरी जर्मनीची त्या देशावर स्वारी करण्याची तयारी कित्येक आठवडे चालली असतां तिचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न ब्रिटिश सरकारनें कसा केला नाहीं ह्या प्रश्नास मि. चेंबरलेन ह्यांनीं दिलेलें उत्तर फारसें समाधानकारक नव्हतें. जर्मनीची स्वारी हॉलंड, बेल्जम, नॉर्वे ह्यांमधील कोणत्याहि राष्ट्रावर होणें शक्य असल्यानें तिची योग्य कल्पना येणें शक्य नव्हतें असें त्यांचें म्हणणें आहे. नॉर्वेंतील जर्मनीच्या व्यापाराची नाकेबंदी ब्रिटिश आरमार करीत होतें तेव्हां तिचा प्रतिकार जर्मनीकडून होणें अपेक्षित असतां ही गोष्ट अकल्पित होती असें मि. चेंबरलेन ह्यांचें समर्थन कोणासहि पटण्यासारखें नव्हतें. हिटलरशाहीचा पाडाव व्हावा ह्यासाठी वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास ब्रिटिश जनता तयार आहे आणि त्याकामीं प्रधान मंडळास तिचा पूर्ण पाठिंबा आहे. आपल्या सामर्थ्याचा व्हावा तसा उपयोग सूत्रचालक करीत नाहींत व त्या कामी जरूर असलेली धडाडी व कार्यक्षमता त्यांचे अंगीं नाहीं अशी टीकाकारांची मुख्य तक्रार आहे. नॉर्वेमध्यें ब्रिटिश सैन्याची पीछेहाट झाल्यामुळें जर्मनीनें हुरळून जाण्याचें अर्थातच कारण नाहीं. मोठ्या युद्धांत असे प्रसंग मधूनमधून घडणें अपरिहार्य आहे. नॉर्वेच्या प्रकरणापासून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनीं जरूर तो बोध घेणें मात्र अगत्याचें आहे.

### युद्धाचा वणवा पसरला—आणीबाणीची वेळ

दोस्त राष्ट्रांच्या फौजांस नॉर्वेमधून माघार घ्यावी लागली, ह्या पीछेहाटीबद्दलच्या रोषाचा स्पष्ट प्रतिध्वनि ब्रिटिश पार्लमेंटमध्यें उठला आणि मि. चेंबरलेन ह्यांस बहुमताचा तात्पुरता विजय मिळाला तरी मंत्रिमंडळाची पुनर्घटना होणें लोकविरोधामुळें अपरिहार्य झालें. मि. चर्चिल ह्यांची मुख्य प्रधान म्हणून नेमणूक होऊन सर्वपक्षीय मंत्रिमंडळाची आतां स्थापना झाली आहे. इंग्लंडमध्यें मतभेद माजले आहेत, त्यांचा फायदा घेण्याचा निश्चय करून हिटलरनें हॉलंड, बेल्जम व लक्सेंबर्ग ह्या तटस्थ देशांवर अचानक स्वारी केली. जर्मनी बेमुर्वतपणानें कोणत्या तटस्थ देशांत आपलें सैन्य पाठवील ह्याचा नियम नसल्यानें नॉर्वेमध्यें आपल्या फौजा अडकवून ठेवणें श्रेयस्कर नव्हतें ह्या मि. चेंबरलेन ह्यांच्या कॉमन्स सभेंतील समर्थनाची सत्यता दोनतीन दिवसांत हिटलर पटवून देईल अशी कल्पना थोड्या लोकांस आली असेल. त्याचप्रमाणें, लहान तटस्थ राष्ट्रांनीं इंग्लंडशीं सहानुभूतीचें धोरण ठेवलें नाहीं तर जर्मनी त्यांच्या अस्तित्वावर केव्हां गदा आणील हें सांगतां येत नाहीं, ह्या आशयाचे सूचक उद्गार मि. चर्चिल यांनीं काढले होते, ते अगदी यथार्थ होते, हेंहि आतां सिद्ध झालें आहे. आपल्या नवीन आक्रमणाचा हेतु हॉलंड व बेल्जम ह्या राष्ट्रांस ब्रिटिशांच्या कुटिल कारस्थानांतून वाचवावें हा असल्याचें जर्मनी सांगत आहे ही हिटलरी क्लृप्ती जुनीच आहे. ह्याच्या उलट, हॉलंड व बेल्जम ह्यांनीं आपला तटस्थपणा टिकवण्याची शिकस्त केली असून त्या योगानें आपलें अस्तित्वहि धोक्यांत आणलें आहे. त्यांनीं आपला तटस्थपणा काटेकोरपणानें संभाळला ह्याचें प्रायश्चित्त हिटलरनें त्यांचीं शहरें उध्वस्त करून आणि निरपराधी लोकांचे प्राण घेऊन दिलें आहे. ह्या आपत्तीमध्यें हॉलंड व बेल्जम ह्या राष्ट्रांनीं इंग्लंडचें सहाय मागितलें आणि तें देण्याचें ब्रिटिश सरकारनें तात्काळ कबूल केलें. अशा रीतीनें युद्ध आतां हातघाईस आलें असून त्याचा वणवा हॉलंड व बेल्जममध्यें पसरला आहे आणि त्याच्या ज्वाला फ्रान्सच्या शहरांपर्यंत येऊन पोंहोचल्या आहेत. मागील महायुद्धाच्या प्रारंभाच्या प्रसंगाची पुनरावृत्ति सध्या चालली आहे. त्यावेळेच्या मानानें ह्या खेपेस लढाऊ विमानांचा धुमाकूळ कितीतरी पटींनीं अधिक आहे. विमानांच्या बाबतींतल्या आपल्या बलिष्ठपणावर जर्मनीची सारी भिस्त आहे. परंतु बेल्जमचें रणांगण पोलंड किंवा नॉर्वे ह्यांच्यापेक्षा अगदी निराळें आहे ह्याचा अनुभव हिटलरला लवकरच येईल. इंग्लंडची मदत बेल्जम व हॉलंड ह्यांस येऊन पोंहोचली आहे आणि ती वाढत्या प्रमाणांत येऊन मिळणार आहे. सध्याचा प्रसंग अत्यंत आणीबाणीचा आहे ह्यांत संशय नाहीं. हिटलरनें आपल्या लढाऊ जुगारीचा शेवटचा डाव टाकला आहे; आणि दोस्तराष्ट्रांच्या विरुद्ध आपलें शक्तिसर्वस्व वेचल्यावांचून तो रहाणार नाहीं. तथापि हीं राष्ट्रें एकजुटीनें व निकरानें लढणार

# आयुर्विमा उतरणारी एक अतिशय मोठी कंपनी

दि सन लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडा ह्या कंपनीची स्थापना सन १८६५ मध्यें झाली. तिनें गेल्या अनेक वर्षांत आपलें व्यवहाराचें क्षेत्र व्यापक करून आपला प्रगतिपर कारभार अव्याहत सुव्यवस्थितपणें चालविला. आयुर्विम्यामुळें विमेदारास सुरक्षितपणा आणि समृद्धता ह्यांची प्राप्ती होते, असा जनतेचा विश्वास असल्याचें सन लाइफची प्रगति हें निदर्शक आहे. आयुर्विम्याचें काम सहकारी तत्त्वांवर चालण्यांत अधिकांत अधिक हित साधतें, हेंहि त्यामुळें सिद्ध होत आहे. आपल्या १० लाखांपेक्षां अधिक विमेदारांना सुरक्षित करणाऱ्या सन लाइफचें काम ह्या पद्धतीनेंच चालू आहे.

पी. व्ही. लाड
यूनिट ऑर्गनायझर, पुणें.

सन लाइफचें कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक आहे. तिच्या कार्यकर्त्यांची कार्यपद्धति उच्च दर्जाची असून ते आपल्या कामांत तज्ञ आहेत. त्यामुळें विमेदारांचीं आणि त्यांच्या हितसंबंधींयांचीं कामें तत्परतेनें, हुशारीनें आणि कुशलतेनें ते पुरीं करतात.

सन १९३९ मध्यें कंपनीनें एकूण २४,८५,९४,०५६ रुपयांपेक्षा अधिक रकम विमेदारांस पोंचती केली. कंपनीनें पहिली पॉलिसी नोंदल्यापासून आतांपर्यंत तिनें ३,५७,४१,५९,०४५ रुपये विमेदारांस वाटले आहेत. १९३९ सालीं कंपनीला ५३,२०,०४,९८६ रुपयांचें नवीन काम मिळालें; म्हणजे एकूण चालू काम ८,०५,०६,२५,३५३ रुपयांचें झालें. कंपनीच्या एकूण मालमत्तेची किंमत आतां २,५०,६२,११,८१२ रुपये आहे.

डी. एस्. दलाल, ब्रँच मॅनेजर.
कॅनडा बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.

Sun Life of Canada
HEAD OFFICE MONTREAL
(Incorporated in Canada in 1865 as a Limited Company).
A LEADER IN PUBLIC SERVICE

असून सर्व जगाची सहानुभूति त्यांच्या पाठीशीं आहे, हें त्यानें लक्षांत ठेवावें. पोलंड व नॉर्वे ह्या देशांत यशस्वी झालेल्या युक्त्या दुसऱ्या नवीन रणांगणांवर त्याच्या उपयोगी पडणार नाहींत. जर्मनीचे हल्ले परतविणें एवढेंच दोस्त राष्ट्रांचें कार्य नसून हिटलरशाहीचा पूर्ण बीमोड करणें हें स्वातंत्र्य, नीति व मानवी संस्कृति ह्यांच्या संरक्षणार्थ अगत्याचें झालें आहे ह्याविषयीं आतां कोठेंहि शंका उरण्याचें कारण नाहीं.

---

### हिंदी कारखान्यांची प्रगति

हिंदुस्थानांत कारखान्यांची आणि त्यांतील कामकऱ्यांची संख्या वाढत चालली असल्याचें त्या विषयींच्या सरकारी रिपोर्टांवरून दिसून येतें. ब्रिटिश प्रांतामध्यें १९३७ सालीं फॅक्टरी कायद्याखालीं येणाऱ्या कारखान्यांची संख्या ९,८९३ होती, ती १९३८ मध्यें १०,७८२ झाली. प्रत्यक्ष काम करणारे कारखाने रिपोर्टाचे वर्षी ९,७४३ होते आणि त्यांपैकी ६,८६ सबंध वर्षभर चालणारे होते. १९३८ मध्यें नवीन कारखाने रजिस्टर झाले, त्यांमध्यें विशेष नांव घेण्याजोगे पंजाब प्रांतांतील स्पर्च बनवण्याचा कारखाना, मुलतान येथील बिस्किटांचा कारखाना, अमृतसर येथील कांचकारखाना व बनारसमधील अल्युमिनियमचा कारखाना हे होत. कपाशीचे कारखाने, गाड्या बांधणें व मोटारी दुरुस्त करणें ह्या विषयींचे कारखाने ह्यांमध्यें वाढ झाली आणि होजिअरी, तेल, सिमेंट, विटा, कौलें, कमावलेलीं कातडीं ह्याविषयींच्या धंद्यांतहि बरीच प्रगति दिसून आली. ह्याबरोबरच कामकऱ्यांच्या संख्येंत वाढ झाली. १९३७ मध्यें ह्यांची संख्या १६ लक्ष, ७६ हजार होती, ती १९३७ मध्यें १७ लक्ष, ३८ हजार इतकी वाढली. मुंबई, मद्रास, पंजाब, बिहार, आसाम, सिंध व संयुक्त प्रांत ह्यांमध्यें ही प्रगति ठळक रीतीनें झालेली आढळते. कापसाचें सूत व कापड करण्याच्या कारखान्यांत ४ लक्ष, ७४ हजार कामगार होते, त्यांची संख्या वाढून ५ लक्ष, १२ हजार झाली. तागाच्या गिरण्यांतली संख्या थोडी घटली आणि ती ३ लक्ष ६ हजारांची २ लक्ष, ९५ हजार झाली. काम करणाऱ्या मुलांची एकूण संख्या थोडी कमी झाली. (१०,७४२) पण स्त्रियांची संख्या वाढून २ लक्ष, ४१ हजार इतकी झाली. स्त्री मजुरांचें एकूण कामकऱ्यांच्या संख्येशीं प्रमाण शेंकडा सुमारें १४ होतें आणि मुलांचें शेंकडा अर्ध्याहून थोडें अधिक होतें. यंत्रांपासून कामकऱ्यांचें संरक्षण करण्याचे आणि त्यांच्या रहाण्याच्या घरांचे बाबत बरीच प्रगति झालेली दिसली. कित्येक कारखान्यांत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचें मार्फत मजुरांच्या चाळींचा पुरवठा होत आहे. तथापि, बहार, ओरिसा, संयुक्त प्रांत, वऱ्हाड, दिल्ली, वायव्य प्रांत येथें ह्यासंबंधांत विशेष सुधारणा झाली नाहीं. कामकऱ्यांचें आरोग्य आणि कारखान्यांतील स्वच्छता व पाण्याची सोय ही साधारणपणें सर्वत्र समाधानकारक होती. गिरण्यांतली हवा सारखी थंड रहावी ह्याविषयीं मुंबई व अहमदाबाद येथील प्रयत्न चालू आहेत आणि त्यांचा अनुकूल परिणाम अनुभवास येत आहे.

---

### जहाजांचा सुएझमधील मार्ग

ब्रिटिश मेलबोटी भूमध्य समुद्रामधून सुएझ कालव्यामधून जातील, पण दुसरीं जहाजें केपच्या बाजूनें जावीं लागतील असें प्रसिद्ध झालें आहे.

### सेवानिवृत्तांचें संमेलन

पुणें येथील विश्राम मंडळाचे विद्यमानें सेवानिवृत्तांचें चतुर्थ संमेलन नूतन मराठी विद्यालयाच्या सभागृहांत काल सकाळीं व संध्याकाळीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. श्री. बाबासाहेब देशपांडे व श्री. नेने ह्यांनीं विश्राम मंडळानें चालवलेल्या कार्याची माहिती देऊन सेवानिवृत्त लोकांनीं मंडळाचे सभासद होऊन लोकसेवेच्या कार्यक्रमास हातभार लावावा अशी विनंति केली. मंडळास चिरस्थायिक प्राप्त व्हावें आणि त्यास स्वतःच्या मालकीचें गृह असावें ह्या संबंधाच्या योजनेचा विचार परिषदेंत झाला. सेवानिवृत्ति म्हणजे लोकोपयोगी कार्यापासून परावृत्त होणें किंवा कांहींहि काम न करतां झोपा काढणें नव्हे असें सांगून अध्यक्ष प्रो. काळे, ह्यांनीं समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या सार्वजनिक जबाबदारीचें विवेचन केलें. सेवानिवृत्तांच्या मार्गांतील अडचणींचें दिग्दर्शन करून त्यांस स्वार्थ व परमार्थ हीं कशीं साधतां येतील ह्याबाबत त्यांनीं उपयुक्त सूचना केल्या.

**THE COMMONWEALTH ASSURANCE COMPANY, LTD., POONA 2.**

## NOTICE TO SHARE-HOLDERS.

Notice is hereby given that the 11th Annual General Meeting of the Commonwealth Assurance Company, Ltd., Poona, will be held at the Company's Registered Office, 980 Sadashive Peth, Laxmi Road, Poona, on Sunday, the 9th June 1940 at 4-30 p. m. to transact the following business:—

1. To receive and adopt:—
   (a) The report of the Board of Directors regarding the affairs of the Company for the Financial year ending 31st December 1939;
   (b) The audited Revenue Account and Balance Sheet for the Financial year ending on 31st December 1939.
2. To appoint auditors as recommended by the Policy-holders for the Current year i. e. 1940 and fix their remuneration. The present Auditor Mr. G. D. Apte, B. A. G. D. A. R. A. retires and is eligible for Re-election and offers himself for the same.
3. To elect three Directors in place of those who retire by rotation. Under Article No. 138 and as per provisions of the Indian Companies Act, in this behalf, three directors viz R. B. Dr. R. K. Naidu, Mr. D. V. Potdar and K. B. M. N. Mehta, retire this year, but are eligible for re-election and offer themselves for the same.
4. To transact such other business as may be brought before the Meeting by the Chairman.

The Transfer Books of the Company will be closed from 30th May to 19th June 1940, both days inclusive.

By order of the Board of Directors
ABHYANKAR & CO.,
Managing Agents

13 May 1940.

## दगडी कोळशांतून तेल

तेलाच्या पुरवठ्याबाबतींत जर्मनीमध्यें काळजी उत्पन्न होण्याचीं कारणें आम्ही आधीच दिलीं आहेत हें येथें ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, प्रस्तुत युद्धाची जर्मनीची तयारी कित्येक वर्षे पद्धतशीर रीतीनें चालली होती आणि परदेशी मालाच्या ऐवजी कृत्रिम बनावटीचा स्थानिक माल वापरण्याची शक्य तितकी तयारी त्यानें केली होती. कृत्रिम माल महाग पडतो, पण अडल्या वेळीं उपयोगास येतो, या विचारानें यंत्रें चालवण्यास शक्ती उत्पन्न करण्यासाठी दगडी कोळशापासून तेल काढण्याचा उपक्रम जर्मनीमध्यें करण्यांत आलेला आहे. अशा कृत्रिम तऱ्हेचा "बदली" माल तयार करण्याच्या प्रयत्नांचा इंग्लंडमध्यें कित्येक वेळां उपहास करण्यांत येतो. त्यावर लंडनमधील "एकॉनॉमिस्ट" ह्या वजनदार साप्ताहिकानें टीका केली असून इंग्लंडमध्यें आरमारी वर्चस्वामुळें व पैशाच्या जोरावर आवश्यक मालाची टंचाई झाली नाहीं तरी त्या देशांतील सर्व साधनांचा अधिकांत अधिक उपयोग युद्धोपयोगी जिन्नस बनवण्याकडे करण्याचें महत्त्व प्रतिपादलें आहे. जळाऊ तेलें बाहेरून आणावीं लागतात, त्यांच्या जागीं देशांत बनवलेला माल कसा वापरतां येईल, ह्या प्रश्नाचा विचार इंग्लंडमध्यें कित्येक वर्षे चालला आहे. कमिश्यांनीं त्याची चौकशी केली आहे आणि प्रयोगादाखल कोळशाचें तेल बनवण्याचीं यंत्रेंहि उभीं केलीं आहेत. एवढा सर्व खटाटोप होऊन शेवटीं अगदीं नडीचा प्रसंग आला तेव्हां चौकशी व शास्त्रीय प्रयोग ह्यांची पुनरावृत्ति करण्याचें आतां उरलें आहे. गेल्या डिसेंबरमध्यें नेमलेल्या तज्ज्ञांच्या एका कमिटीच्या सल्ल्यावरून सहा कमिट्या नेमण्यांत यावयाच्या आहेत आणि त्या दगडी कोळशापासून तेल काढण्याची कृतीची सर्वांगीण छाननी करणार आहेत. ह्या कमिट्या नामांकित शास्त्रज्ञांच्या आहेत आणि त्यांचें काम उत्कृष्ट होईल ह्यांत शंका नाहीं असें 'एकॉनॉमिस्ट' म्हणतो. शास्त्रीय संशोधन व चौकशी इतक्या काळपर्यंत झालेली असतां सध्याच्या तातडीच्या गरजेच्या वेळीं ह्या बाबतींत सर्व गोष्टी पुन्हा प्रारंभापासून करण्याची आवश्यकता भासावी, ह्याचें मात्र ह्या साप्ताहिकास आश्चर्य वाटत आहे. बाहेरून तेल विकत घेऊन आणण्याचें सामर्थ्य इंग्लंडमध्यें असलें तरी तें काटकसरीनें वापरणें इष्ट आहे असें त्यानें सुचवलें आहे.

---

### टेलिफोन कंपन्यांची किंमत

कलकत्ता, मद्रास आणि मुंबई ह्या कंपन्या हिंदुस्थान सरकारनें विकत घ्यावयाच्या म्हटल्यास त्यांची खरेदीची किंमत ५ कोटि रुपये असावी असा अभिप्राय त्याबाबत नेमलेल्या खास अधिकाऱ्यांनीं व्यक्त केला आहे.

### औद्योगिक वांधे

१९३९ च्या शेवटच्या तिमाहींत ११० औद्योगिक वांध्यांत १ लक्ष, ६९ हजार कामगारांचे कामाचे ८½ लक्ष दिवस बुडाले. १९३९ च्या तत्सम मुदतींत १३६ वांध्यांत १३ हजार कामगारांचे कामाचे २० लक्ष तास बुडाले होते. वांधे मुख्यतः तागाच्या आणि कापडाच्या गिरण्यांत उपस्थित झाले. ७६% वांध्यांचें मूळ वेतनासंबंधीं भांडण हें होतें.

### इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चची शुगर कमिटी

इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या साखर कमिटीची सभा येत्या जूनमध्यें भरणार आहे, त्यावेळीं साखरेच्या फाजील उत्पादनाचा प्रश्न तिच्यापुढें येईल. शहाजानपूर येथील शुगर रिसर्च इन्स्टिट्यूट सध्या संयुक्त प्रांताचे नियंत्रणाखालीं आहे, तिला अखिल भारतीय स्वरूप देण्यासंबंधींहि कमिटी विचार करील.

कमिटीच्या एकूण सभासदांची संख्या ३६ आहे. इंपीरिअल कौन्सिलचे उपाध्यक्ष हे साखर कमिटीचे अध्यक्ष असून कमिटींत मध्यवर्ती सरकारतर्फे ५ तज्ज्ञ असून प्रांतिक सरकारांतर्फे ८ तज्ज्ञांची तीवर नेमणूक करण्यांत आली आहे. मद्रास, बंगाल, पंजाब, म्हैसूर ह्यांचा प्रत्येकी १ प्रतिनिधि असून संयुक्त प्रांत आणि बिहार ह्यांचे प्रत्येकी २ प्रतिनिधि आहेत. साखर कारखान्यांचे कमिटीवर ९ प्रतिनिधि आहेत, त्यांपैकी २ इंडियन शुगर मिल्स असोसिएशननें पाठवावयाचे असून २ इंडियन शुगर प्रोड्यूसर्स असोसिएशननें नियुक्त करावयाचे आहेत. पश्चिम हिंदुस्थानांतील कारखाने, दक्षिण हिंदुस्थानांतील कारखाने, बंगालमधील कारखाने इतर ठिकाणचे कारखाने ह्यांसाठी प्रत्येकी १ आणि खंडसारी साखरेच्या धंद्याकरितां १, असे ५ सभासद इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या अध्यक्षांनीं ठरवावयाचे असतात. पश्चिम हिंदुस्थानांतील साखर कारखान्यांचे प्रतिनिधि म्हणून प्रो. वा. गो. काळे ह्यांची नेमणूक झाली आहे. ऊंस पेरणाऱ्यांचे ८ प्रतिनिधि पांच प्रांतिक सरकारांनीं निवडावयाचे आहेत, त्यांत मुंबई प्रांताच्या ऊंस बागाइतदारास स्थान नाहीं. संयुक्तप्रांत, बिहार, पंजाब, बंगाल आणि मद्रास ह्यांत हे ८ प्रतिनिधि वाटलेले आहेत.

साखरेच्या व्यापाऱ्यांसाठी २ जागा आहेत, बाँबे शुगर मर्चंट्स असोसिएशन आणि कानपूर शुगर मर्चंट्स असोसिएशन ह्यांचे वाट्यांस त्यांतील प्रत्येकी एक जागा आली आहे. साखरेच्या उपभोक्त्यांचे ३ प्रतिनिधि शुगर कमिटीच्या अध्यक्षांनीं निवडले म्हणजे ३६ सभासदांची कमिटी पुरी होते. हिंदी साखरेच्या धंद्यास मदत करण्याचे दृष्टीनें कोणती योजना करावी, ह्याबाबत सल्ला देण्याचें कमिटीचें काम आहे.

---

### जर्मनीचा कोंडमारा

जर्मनीचा आर्थिक कोंडमारा अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न दोस्त राष्ट्रें करीत आहेत. जर्मनीस लागणाऱ्या अन्नसामुग्रीपैकीं ⅞ पेक्षां अधिक जर्मनीमध्यें तयार होते, परंतु युद्धविषयक मालासाठीं मात्र त्या देशास परदेशांवर अतिशय अवलंबून रहावें लागतें हें खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल:—

| | जर्मनीचें अंतर्गत उत्पादन % | आयात |
|---|---|---|
| मांस | ९३ | ७ |
| साखर | १०० | ० |
| दूध | १०० | ० |
| चरबीयुक्त अन्न | ६४ | ३६ |
| फळें | ७० | ३० |
| भाज्या | ८९ | ११ |
| गहूं | १०० | ० |
| तेल | ४३ | ५७ |
| लोखंड | ४८ | ५२ |
| निकेल | १३ | ८७ |
| रबर | ० | १०० |
| तांबे | १५ | ८५ |

## सनलाइफची प्रगति

सन लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडाची ६९ वी वार्षिक सभा नुकतीच भरली होती, त्यावेळीं तिचे अध्यक्ष मि. ऑर्थर बी. वुड यांनीं कंपनीच्या कारभारासंबंधीं कांहीं महत्त्वाचे आकडे सांगितले. कंपनीची मालमत्ता २१ अब्ज रुपयांपेक्षा अधिक असून तिचें उत्पन्न गेल्या वर्षी आतापर्यंतच्या कोणत्याहि वर्षापेक्षां अधिक भरलें, असें त्यांनीं अभिमानपूर्वक सांगितलें. १९३९ मध्यें कंपनीनें विमेदारांस २५ कोटि रुपये दिले; म्हणजे १८७१ मध्यें कंपनीनें व्यवहारास प्रारंभ केला, तेव्हांपासून तिनें आजवर विमेदारांस वाटलेल्या रकमेचा आकडा ३ अब्ज, ५७ कोटि रुपयांवर गेला. सन लाइफ ऑफ कॅनडा ही त्या वसाहतींतील सर्वांत मोठी विमा कंपनी असून तिच्या विमेदारांची संख्या १० लाखांवर आहे. आयुर्विमा क्षेत्रांतील अग्रगण्य संस्थांत तिला मानाचें स्थान आहे.

### युद्धाचा कंपनीवर परिणाम

गेल्या महायुद्धामुळें उपस्थित झालेल्या क्लेम्सचें त्यावेळीं चालू असलेल्या विम्यांशीं जें प्रमाण पडलें, त्यापेक्षा सध्याच्या युद्धामुळें उपस्थित होणाऱ्या क्लेम्सचें चालू विम्यांशीं प्रमाण कमी पडेल, असे मि. वुड म्हणाले. विमापत्रकांतील युद्धविषयक अट जे देश युद्धांत पडले आहेत अशांतील नव्या विमाकरारांसच लागू असल्यामुळें, त्या विमापत्रासच युद्धविषयक धोका लागू पडतो. अशा पॉलिसींपैकी बहुसंख्य पॉलिसी अनेक वर्षें चालू असल्याकारणानें आणि कंपनीच्या विमेदारांचें सरासरी वय ४० चे वर असल्यानें लष्करांत दाखल होण्याचा त्यांवर प्रसंग येत नाहीं. तटस्थ राष्ट्रांत सन लाइफचें जेवढ्या मोठ्या प्रमाणांत काम आज चालू आहे, तितकें तें गेल्या महायुद्धाचे वेळीं नव्हतें.

कंपनीकडे एकूण ८ अब्ज, ९ कोटि रुपयांपेक्षा अधिक रकमेचे विमे चालू आहेत; आणि गेल्या सालीं तिला ५३ कोटि रुपयांचें, म्हणजे १९३८ पेक्षां अधिक काम मिळालें असें डायरेक्टरांच्या रिपोर्टावरून दिसतें.

---

## पुणें शहर म्युनिसिपॅलिटीची तज्ञ समिति

पुणें शहर म्युनिसिपालिटीनें नेमलेल्या तज्ञ समितीच्या प्रश्नमालिकेंतील कराबाबतच्या प्रश्नांची यादी येथें दिली आहे. समितीस सूचना करण्याची शेवटची तारीख १ जून, १९४० ही आहे.

१. घरपट्टी, ड्रेनेजपट्टी व पाणीपट्टी या करांच्या ऐवजीं कन्सॉलिडेटेड ( संयुक्त कर ) टॅक्स बसवावा असें आपलें मत आहे काय ?

२. सायकल टॅक्स म्युनिसिपालिटीनें बसविण्यास कांहीं हरकत आहे काय ?

३. म्युनिसिपालिटीनें लायटिंग ( दिवाबत्ती ) कर बसविणें आपणास मान्य आहे काय ?

४. धंद्यांवरील कर ( प्रोफेशन टॅक्स ) बसवावा काय ?

५. हम–मुंजीवर कर बसविणें इष्ट व शक्य आहे काय ? या कराची योजना कोणत्या स्वरूपाची असावी ?

६. हल्लीचे कराचे दर वाढवावे असें आपणास वाटतें काय ?

७. कर बसविण्याच्या आणि ते वसूल करण्याच्या पद्धतींत कांहीं दोष आपणास वाटतात काय ? असल्यास ते कोणते ?

---

## बेल्जम व हॉलंड

युरोपच्या उत्तर किनाऱ्यावर, फ्रान्स आणि जर्मनी ह्यांचे मधोमध हॉलंड आणि बेल्जम हे देश आहेत. ह्या देशांचे रणांगणांवर जितक्या लढाया आजवर झाल्या तितक्या दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या समरभूमीवर झालेल्या नाहींत. वोव्हीन्स, ब्लेनहेम, वॉटर्लू आणि इप्रे हीं सुप्रसिद्ध रणांगणें बेल्जम हद्दींत आहेत. हॉलंड आणि बेल्जम हे दोन्हीं देश दाट-वस्तीचे आहेत; आणि जमिनीवरून युरोपियन शत्रूंचा हल्ला होण्यास सोपें जाईल, अशी त्यांची स्वाभाविक परिस्थिति आहे. जर्मनीनें त्यांचेवर आतां हल्ला चढविला आहे.

### बेल्जम

वस्तीच्या दाटपणांत बेल्जमचा युरोपांतील सर्व देशांत पहिला नंबर लागतो. प्रत्येक चौरस मैलांत ६८८ लोकवस्ती, असें तेथें प्रमाण पडतें. बेल्जम हें औद्योगिक बाबतींत फार पूर्वीपासून पुढारलेलें राष्ट्र आहे. कोळसा, लोखंड आणि पोलाद ह्यांसाठीं बेल्जमची विशेष ख्याति आहे. स्पेन, ऑस्ट्रिया, हॉलंड इत्यादि राष्ट्रांचे सत्तेखालीं अनेक वर्षें काढल्यावर १८३० सालीं बेल्जम हॉलंडपासून स्वतंत्र झाला, त्यास इंग्लंड व फ्रान्स ह्यांची अतिशय मदत मिळाली. १८३९ च्या लंडनच्या तहान्वयें प्रमुख युरोपियन राष्ट्रांनीं बेल्जमच्या स्वातंत्र्याची ग्वाही दिली. हाच तह १९१४ सालीं जर्मनीनें कस्पटासमान मानून महायुद्धाचा वणवा पेटवला. ह्या युद्धानंतरच्या तहामुळें बेल्जमला नवीन मुलूख मिळाला, तरी त्यानें बेल्जमचें पूर्ण समाधान झालें नाहीं. बेल्जम हें राजसत्ताक राष्ट्र आहे. बेल्जिअन काँगो हा युरोपाबाहेरील बेल्जमचे ताब्यांतील महत्त्वाचा मोठा प्रदेश आहे.

### हॉलंड

हॉलंडची लोकवस्ती बेल्जमइतकीच म्हणजे सुमारें ८०½ लक्ष असून प्रत्येक चौरस मैलास ६२५ लोकसंख्या असें तिचें प्रमाण पडतें. लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे.

हॉलंडचा बराच मोठा भाग पाण्याखालीं असून बांध फोडून प्रदेश जलमय करणें हें त्या राष्ट्राच्या बचावाचें एक प्रमुख नैसर्गिक साधन आहे. ॲम्स्टरडॅम ह्या शहराची लोकसंख्या सर्वांत जास्त म्हणजे सुमारें ८ लक्ष आहे. हॉलंडमधील शेतीचा धंदा अत्यंत पद्धतशीर असून तेथें दर एकरीं उत्पादनाचें प्रमाण फार मोठें पडतें. मलई, लोणी व अंडीं ह्यांसाठीं हॉलंडची ख्याती आहे आणि हॉलंडमध्यें आतां कारखान्यांचीहि वाढ झाली आहे, परंतु वहातुकीचे धंद्यांत त्याचें अग्रेसरत्व राहिलेलें नसलें तरी डच आगबोटींचा वहातुकीचा धंदा अजूनहि मोठ्या प्रमाणावर चालतो. १६ व्या शतकापासून हॉलंडचा राष्ट्र ह्या नात्यानें क्रमवार इतिहास लागतो. १७ व्या शतकांत हॉलंडचें सामर्थ्य पुष्कळच वाढलें, परंतु नंतर त्याचा आर्थिक ऱ्हास झाला. आफ्रिकेंतील त्याचे सत्तेखालील प्रदेश त्यास सोडावे लागले. मलाया मात्र डच साम्राज्यांत अद्याप मोडतो.

---

### विम उमेदवारीचा धंदा

"थोडे शिकण्याचा एक साधा धंदा घेतला तरी तो शिकण्यास अनेक वर्षें उमेदवारी करावी लागते. राष्ट्रासाठीं कायदे करण्याचाच तेवढा उद्योग असा आहे, कीं त्यांत उमेदवारीची मुळीच जरूर भासत नाहीं."

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११—८ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन | १०१—६ |
| ४% १९४३ | १०६—० |
| ३½% बिनमुदत | ९३—८ |
| ३½% १९४७–५० | १०३–१,०–६ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४—८ |
| २¾% १९४८–५२ | ९७—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) | १११—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२१—८ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४०—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०२—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | ३६—२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५४०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०३—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १३४–१२ |
| कराची ( १०० ) ९% | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३४५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १५४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७७२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २२३—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४९—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३८–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४३८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १४८—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३९६—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | २१५०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | १२०—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४३—३—६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६१—०—० |

स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.

मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे


★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस

★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रसं व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| रजिस्टर्ड ऑफिस : | बिझिनेस ऑफिस : |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें २ | ९९२A सदाशिव, पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय, आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )

२५।३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

—ॐ सत्यमेवजयते—
सुकामेवा एक आणा पाकीट
लोणच्यांचें साहित्य
म्हणजे
निवडक सर्व किराणा
मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल (पॅक बाटल्या), मेथी भरडा, स्पेशल हिंग,
तांबडें लाल (भडक) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.
लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे!
—: दत्तात्रय नारायण हेर्जीब :—
किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २
लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.